# सायबर सुरक्षेवर अंजुमन हायस्कूल मध्ये सेमिनार



**प्रतिनिधी/ २३ ऑक्टोबर**

**अकोला::** बाळापूर येथील अंजुमन हायस्कूल मध्ये सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले . शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स वैष्णवी बेलंगे आणि सलोनी जैस्वाल यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल आणि इंटरनेटच्या चुकीच्या वापरा मुळे होणारे नुकसान आणि त्यावर उपाय या विषयी सर्वोपयोगी मार्गदर्शन केले. फेक वेबसाइट्सच्या माध्यमातून कशी फसवणूक होते आणि या पासून आपण कसे सुरक्षित राहावे या विषयी सखोल माहिती सांगितली. टू स्टेप व्हेरिफिकेशन आणि इतर सुरक्षा टिप्स असलेले माहितीपत्रकाचे वाटप केले. आणि मोबाईलचा योग्य उपयोग करण्यासाठी शपथ दिली.कार्यक्रमाचे आयोजन शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोलाचे प्राचार्य डॉ. जे. एम. साबू, समन्वयक डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली, क्विक हिल फाउंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या सहयोगाने आणि विद्यालयाचे प्राचार्य शेख मुख्तार खान यांच्या परवानगीने कार्यक्रम आयोजित केला होता. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सेमिनारच्या आयोजनासाठी विद्यालयाचे प्राचार्य आणि सहकाऱ्यांचे आभार व्यक्त केले.